## " BEST CONVICTION OF THE MONTH SEPTEMBER 2019"

दिनांक **०४/१२/२०१९** रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते भरूचा सभाग्रह, सहावा मजला, नविन पोलीस आयुक्त इमारत,पोलीस आयुक्त कार्यालय मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या **माहे सप्टेंबर –२०१९** या महिन्याचा **" BEST CONVICTION OF THE MONTH "** चा पुरस्कार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| **०२** | **गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष–१२** | **गु.प्र.शा. गुरक्र. २७/२०१५ कलम ३०२, ३४१, २१२,३४ भादवि सह कलम ३७(१) (अ) सह १३५ मुपोका (कुरार पोलीस ठाणे गु.र.क्र. ५१/१४)** |

**" खून "**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत**:— दिनांक १६/०२/१५ रोजी ०२.३० वाजताचे दरम्यान पिंपरीपाडा, स्वप्नलोक अपार्टमेन्टसमोर कुरार गाव मालाड (पुर्व), मुंबई येथे एक २२ ते २५ वयाच्या अनोळखी इसमाच्या डोक्यात सिमेंटच्या दगडाने (पेव्हरब्लॉक) ठार मारण्याच्या उददेशाने जाणीवपुर्वक जबर जखमी केले म्हणून त्या अज्ञात इसमाविरूध्द कुरार पोलीस ठाणे येथे नेमणुकीस असलेले पो.शि.क्र.११०२१५/ दिपक दादा दडस यांनी सरकारतर्फे कायदेशीर तक्रार दिल्याने त्यांचा सविस्तर जबाब नोंद करून गुन्हा दाखल करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री. दिपक दादा दडस हि./ २६ वर्षे. |
| **बळीत/मयत** | :— | अफजल इलीयास बेग उर्फ सिमडीया उर्फ हटेला, वय २२ |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | १) शिवानंद ओमप्रकाश मिश्रा, उर्फ डब्बु,वय २५ वर्षे,<br>२) अमोल सुरेश घुगे, हिं.२२ वर्षे,<br>३) इफ्तेकार मुमताज अन्सारी, मु.२५ वर्षे,<br>४) जयपाल रघुनाथ सुर्यवंशी हिं.२४ वर्षे,<br>५) विशाल हिरामण अटकाळे, हि.२३ वर्षे,<br>६) विकास राजाराम गाढवे उर्फ विक्की,<br>७) सिध्दार्थ प्रकाश जवरास हिं.२१ वर्षे,<br>८) अविनाश राजन आंबेकर, वय २१ वर्षे |
| **निकाल दिनांक** | :— | १) आरोपी क्र. १ ते ७ यांना दि १७/०२/२०१५ रोजी १५.३० वा. अटक करण्यात आली.<br>२) आरोपी क्र. ८ यांस दि. १८/०२/२०१५ रोजी ०९.३० वा. अटक करण्यात आली. |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :— | १) अ) आरोपी क्र.२ यांस भादवि कलम ३०२ सह ३४ अन्वये आजन्म कारावास, रु.५,०००/— द्रव्यदंड आणि द्रव्यदंड न भरल्यास ०१ महिने साधी कैद, तसेच भादवि कलम ३४१ सह ३४ अन्वये ०१ महिने साधी कैद, रु.५,००/— द्रव्यदंड आणि |

| | | |
|---|---|---|
| | | द्रव्यदंड न भरल्यास ०१ आठवडा साधी कैद.<br>२) आरोपी क्र.५ यास भादवि कलम ३०२ सह ३४ अन्वये आजन्म कारावास, रु.५,०००/— द्रव्यदंड आणि द्रव्यदंड न भरल्यास ०१ महिने साधी कैद, तसेच भादवि कलम ३४१ सह ३४ अन्वये ०१ महिने साधी कैद, रु.५,००/— द्रव्यदंड आणि द्रव्यदंड न भरल्यास ०१ आठवडा साधी कैद.<br>३) आरोपी क्र.८ यांस भादवि कलम ३०२ सह ३४ अन्वये आजन्म कारावास, रु.५,०००/— द्रव्यदंड आणि द्रव्यदंड न भरल्यास ०१ महिने साधी कैद व भादवि कलम ३४१ सह ३४ अन्वये ०१ महिने साधी कैद, रु.५,००/— द्रव्यदंड आणि द्रव्यदंड न भरल्यास ०१ आठवडा साधी कैद, सर्व शिक्षा आरोपीतांनी एकत्रित भोगायच्या आहेत.<br>तसेच आरोपी .क्र.१) शिवानंद ओमप्रकाश मिश्रा, उर्फ डब्बु,वय २८ वर्षे,<br>आरोपी.क्र.३) इफ्तेकार मुमताज अन्सारी, मु.३० वर्षे,<br>आरोपी.क्र.४) जयपाल रघुनाथ सुर्यवंशी हिं.२९ वर्षे,<br>आरोपी.क्र.६) विकास राजाराम गाढवे वय २६ वर्षे,<br>आरोपी.क्र.७) सिध्दार्थ प्रकाश जवरास वय २६ वर्षे,<br>यांना मा. न्यायालयाने पुराव्याअभावी सदर गुन्हयातुन दोषमुक्त केले आहे. |

१. **<u>तपास कौशल्य</u> :—** नमुद घटनेची पार्श्वभुमी थोडक्यात अशी आहे की, दिनांक १६/०२/२०१५ रोजी ०२.३० वा उत्तर प्रादेशिक विभागाकडून कुरार मोबाईल ०१ ला संदेश प्राप्त झाला की, पिंपरीपाडा येथे एक इसमास मदत पाहिजे असून त्या ठिकाणी पोहोचणे. काही वेळातच तेथे कुरार मोबाईल घटनास्थळी पोहोचली असता तेथे स्वप्नलोक अपॉर्टमेन्ट गेटच्या समोर एक २२ ते २५ वयाचा इसम डोक्यास मार लागलेल्या अवस्थेत पडलेला दिसून आला. त्याचे शेजारी जावून पाहिले असता तो बेशुध्द अवस्थेत असल्याचे दिसून आले. त्यावेळी कुरार वन मोबाईल त्यास शताब्दी रूग्णालय कांदिवली (पश्चिम), मुंबई येथे पुढील उपचारासाठी घेवून गेले असता वैदयकीय अधिकारी यांनी त्यास तपासुन पुढील उपचारासाठी अतिदक्षता विभागामध्ये दाखल केले. सदरचा अनोळखी इसम हा बेशुध्द अवस्थेत असल्याने डॉक्टरांनी त्याबाबतचे ॲन्डॉसमेन्ट सर्टीफिकेट दिले व पुढील उपचार चालु केले.

२. सदरचा गुन्हा पुढील तपासाकरिता कक्ष—१२, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबईकडे वर्ग झाला होता. सदर गुन्हयामध्ये गुन्हे शाखेने नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने तपास करून सदर गुन्हयात आरोपी नामे १) शिवानंद ओमप्रकाश मिश्रा, उर्फ डब्बु,वय २५ वर्षे, २) अमोल सुरेश घुगे, हिं.२२ वर्षे, ३) इफ्तेकार मुमताज अन्सारी, मु.२५ वर्षे, ४) जयपाल रघुनाथ सुर्यवंशी हिं.२४ वर्षे, ५) विशाल हिरामण अटकाळे, हि.२३ वर्षे, ६) विकास राजाराम गाढवे उर्फ विक्की, ७) सिध्दार्थ प्रकाश जवरास.हिं.२१वर्षे, यांना

दि. १७/०२/२०१५ रोजी १५.३० वा. अटक करण्यात आली. दरम्यान गुन्हयातील जखमी इसम नामे अफजल इलियास बेग उर्फ हटेला वय २२ वर्षे हा शताब्दी रुग्णाालय कांदिवली (पश्चिम), मुंबई येथे उपचार घेत असताना दिनांक १७/०२/२०१५ रोजी सायंकाळी १७.३० वा. मयत झाला. त्यानंतर सदर पथकाने यातील आ.क्र. ८) अविनाश राजन आंबेकर, वय २१ वर्षे यास दिनांक १८/०२/२०१५ रोजी ०९.३० वा. अटक करण्यात आली.

३. सदर गुन्हा घडण्यापूर्वी दिनांक १५/०२/२०१५ रोजी सायंकाळच्या दरम्यान यातील अटक आरोपी विशाल अटकाळे व त्याच विभागात राहणारा विकी जालिंदर सकपाळ यांच्यामध्ये किरकोळ कारणावरून वादविवाद झाला होता. त्यानंतर आरोपी शिवानंद मिश्रा हा दिनांक १६/०२/२०१५ रोजी ०१.०० वा च्या दरम्यान साक्षीदार नामे विकी सकपाळ याच्या घरी जेवणाकरिता जात असताना त्यास रस्त्यात मयत इसम अफजल बेग हा भेटला. आरोपी शिवानंद मिश्रा हा मयत इसमास विकी सकपाळ याच्या घरून मोटर सायकलवर बसवुन घटनास्थळी घेवुन आला. अर्जदार आरोपी शिवानंद मिश्रा याच्या मोटर सायकलच्या मागोमाग अटक आरोपी अमोल घुगे, विशाल अटकाळे व अविनाश आंबेकर हे त्यांच्या मोटर सायकलवरून घटनास्थळी पोहोचले व त्यांनी मयत इसम अफजल बेग याच्याशी वादविवाद करून मयत इसमास रस्त्यावरील पेव्हरब्लॉकने गंभीर जखमी करून पळून गेले.

४. मयत इसमाचे वडिल श्री. मोहमद इलियास नासीर बेग, वय ६० वर्षे यांनी त्यांच्या जबाबात नमूद केले की, मयत इसम अफजल बेग व अटक आरोपी अविनाश आंबेकर या दोघांमध्ये पूर्वीपासुन वादविवाद चालू होते. आरोपी अविनाश आंबेकर व शिवानंद मिश्रा उर्फ डब्बु हे दोघे चांगले मित्र असुन त्यांनी इतर आरोपीतांच्या सांगण्यावरून मयत इसमास जाणीवपूर्वक घटनास्थळी घेवुन आला.

५. सदर गुन्हयाच्या तपासात दोन स्वतंत्र साक्षीदारांचा मा. न्यायालयासमोर फौदप्रस. कलम १६४ प्रमाणे जबाब नोंद करण्यात आला असुन त्यांनी त्यांच्या जबाबात सांगितले की, अटक आरोपी अमोल घुगे हा विशाल अटकाळे याचेसोबत येवून त्याने मयत अफजल बेग याच्यासोबत भांडण झाल्याचे सांगितले. सदर साक्षीदार थोडया वेळानंतर काय झाले हे पाहण्यासाठी घटनास्थळी पोहोचले असता घटनास्थळी आरोपी शिवानंद मिश्रा, अमोल घुगे, अविनाश आंबेकर व विशाल अटकाळे हे हजर असून त्यांनी मयत इसमास लाथाबुक्यानी व पेव्हरब्लॉकने मारहाण केली व जबर जखमी केले.

६. सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी पो.नि विश्वासराव यांनी मयतास जिवे ठार मारण्याकरीता वापरलेले सिमेंटचे पेव्हर ब्लॉक्स तसेच रक्ताचे नमुने व आरोपीताचे कपडे यावर पडलेले रक्ताचे डाग घटनास्थळावरुन सविस्तर पंचनामा व्दारे हस्तगत केले. व तपासणीकरीता रासायनिक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिना, सांताक्रुज मुंबई येथे पाठवुन विहित वेळेत अहवाल प्राप्त करून तो मा. न्यायालयात सादर केला.

**७.** कक्ष—१२, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई या कक्षाचे पैरवी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश चंद्रकांत सावंत व कोर्ट कारकुन —म.पो.ना.क्र.७७१/अश्विनी देवळेकर यांनी खटल्यातील साक्षिदारांना विविध ठिकाणाहुन आणुन फिर्यादी, पंच, साक्षिदार, रासायनिक तज्ञ, डॉक्टर यांना चिफ व क्रॉस जबाबासबंधी योग्य ती ब्रिफींग

केले. तसेच मा. सरकारी अभियोक्ता यांचेशी समन्वय साधून इतर सबळ शास्त्रोक्त पुरावे मा. न्यायालयासमोर व्यवस्थित मांडले. तसेच पो.ना.क्र. ३३०५९/दिनेश राणे यांनी मा. न्यायालयाकडून प्रत्यक्ष सुनावणीचेवेळी साक्षीसाठी प्राप्त झालेले समन्सची विहित वेळेत बजावणी करुन साक्षीदारांना वेळेत साक्षीकरीता न्यायालयात हजर ठेवण्याची सर्वोतोपरी काळजी घेतली. तसेच यातील पैरवी अधिकारी व स्टाफ यांनी नमद गुन्हयांमध्ये अटक आरोपीतांची ओळख परेड घेण्याकरीता मा. तहसिलदार कार्यालय, बोरीवली पश्चिम, मुंबई येथे पत्रव्यवहार करुन त्याबाबत पाठपुरावा करुन नमुद कार्यालयातील नायब तहसिलदार श्री. दत्तात्रय बेंडेकर यांना ओळख परेडकरीता आर्थर रोड मध्यवर्ती कारागृह, मुंबई येथे सरकारी पंचासह उपस्थित ठेवून ओळख परेड पुर्णत्वास नेली. तसेच नमुद गुन्हयात अटक आरोपीतांचा घटनास्थळी उपस्थित असल्याचे व त्यांनीच बळीत इसमावर हल्ला केल्याचे प्राप्त सिसिटिव्ही फुटेज संग्रहित केलेली सिडी ही मा. न्यायालयास पो.ना.क्र.९८०४५१/संतोष गायकवाड यांनी प्रात्यक्षिक न्यायालयात दाखविल्याप्रमाणे मा. न्यायालयाने भौतिक पुरावा ग्राहय धरला आहे. याप्रमाणे संपूर्ण गुन्हयाच्या सुनावणीच्या न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान पैरवी अधिकारी व अंमलदार यांनी साक्षीदारांचा शोध घेवून, त्यांना मा. न्यायालयात हजर करणे, मा.न्यायालयात पुराव्याचे कागदपत्र योग्यरितीने सादर करणे, सरकारी अभियोक्ता यांच्याशी योग्यरितीने समन्वय साधणे अशा प्रकारची कामगिरी कक्षाने उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

मा. पोलीस आयुक्त यांनी माहे सप्टेंबर–२०१९ चे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कुष्ठ गुन्हे दोषसिध्दी या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

**कक्ष–१२, गुन्हे प्रकटीकरणा शाखा, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव |
|---|---|---|
| १ | पो.नि. | संदिप विश्वासराव |
| २ | सपोनि | प्रकाश सावंत |
| ३ | मपोनाक्र.७७१ | अश्विनी देवळेकर |
| ४ | पोनाक्र. ३३०५९ | दिनेश राणे |
| ५ | पो.ना.९८०४५१ | संतोष गायकवाड |

,,,,,,,,,,,